# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### धानला (ता.जि.नागपूर) येथील दलीतवस्ती विकास योजनेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१) १४१२२ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानला (ता.जि.नागपूर) येथील दलीत वस्ती विकास योजनेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०६-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) त्या अनुषंगाने चौकशी केली असता, अनियमितता झाल्याचे आढळून आलेले आहे. सदर अनियमिततेशी संबंधित कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

---

### बिजलीनगर (जि.पुणे) येथील राजर्षी शाहू महाराज उद्यानातील खेळण्यासह खुल्या व्यायाम साहित्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२) १५२४९ (२९-१२-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिजलीनगर (जि.पुणे) येथील राजर्षी शाहू महाराज उद्यानातील खेळण्यासह खुल्या व्यायाम साहित्यांची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुरवस्था झालेल्या खेळण्यांमुळे मुलांना इजा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्यानाची काही महिन्यांपूर्वीच नुतनीकरण करण्यात आले असताना उद्यानातील खेळणी व साहित्य तुटलेले असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उद्यानातील खेळणी व साहित्यांची दुरवस्था करणाऱ्यांवर कारवाई करुन उद्यानातील खेळणी व साहित्य बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०६-२०२३) : (**१) बिजलीनगर येथील राजर्षी शाहू उद्यानातील ३ प्रकाराच्या एकूण चार खेळण्यांची व व्यायाम साहित्याची नादुरुस्ती झाली होती.
(२) सदर नादुरुस्त झालेली खेळणी व व्यायाम साहित्य काढुन ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे मुलांना इजा होण्याचा कोणताही धोका निर्माण झालेला नव्हता.
(३) सदरची खेळणी सन २०१७-१८ मध्ये लावण्यात आली आहेत. उद्यानाचे नुतनीकरण सन २०१९-२० मध्ये करणेत आले आहे. मात्र त्यामध्ये खेळणी नवीन लावण्यात आलेली नव्हती.
(४) सदर नादुरुस्त खेळणी दुरुस्त करण्यात आलेली असून सर्व खेळणी सुस्थितीत आहेत तर व्यायाम साहित्याच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करोडो रुपयांचा मालमत्ता कर थकबाकीच्या वसुलीबाबत

**(३) १५५०७ (२९-१२-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेची गत वर्षांतील मालमत्ता करापोटी रुपये १४,६८९ कोटी एवढी रक्कम थकीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने थकीत मालमत्ता कर रकमेच्या वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक २५९२/२०१३ च्या अंतरिम आदेशानुसार बहुतांशी करदाते मागणीच्या ५०% रकमेचे अधिदान करत आहेत. तथापि, जास्तीत जास्त थकीत करवसुली करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०२ ते २०६ मधील तरतुदींचा अवलंब करुन जलजोडणी खंडीत करणे, चल मालमत्तांची अटकावणी, अचल मालमत्तांची जप्ती अटकावणी व लिलाव इत्यादी कार्यवाही करण्यात आली व येत आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ च्या तरतुदीनुसार थकबाकीदारांवर थकीत मालमत्ता कराच्या देय दिनांकापासून २% प्रतिमाह दराने दंड आकारणी करण्यात येते. तसेच परिमंडळ स्तरावर वसुली कक्ष स्थापन करण्यात येऊन मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे होण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येतात.

भांडवली मुल्याधारित कर प्रणालीमध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०६ च्या तरतुदीनुसार थकीत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तांची विक्री करण्याबाबतच्या

विनियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार जाहीर लिलावाद्वारे अचल मालमत्तांची विक्री करण्याबाबतची कार्यवाही विभाग पातळीवर सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगपालिकेच्या विकासकामांचा प्रलंबित निधी वितरित करण्याबाबत

**(४) १५८९२ (२९-१२-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १०६३६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे शासकीय अनुदानातून करण्यात येत असलेल्या अनेक विकास कामांचे अनुदान प्राप्त झाले नसल्यामळे निधीअभावी विकासकामे अपूर्ण अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांचा विकास" या योजनेंतर्गत शासन निर्णय क्र. मनपा २०१९/प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १५७.५० कोटींच्या विकास कामांना मान्यता देवून प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी रुपये ९३.९६ कोटी निधी वितरित केला असून विकास कामांसाठी मंजूर केलेला निधीपैकी उर्वरित निधी केव्हा वितरित करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण, चांदमारी येथील रस्ता बांधणी, शुक्रवारी तलाव सौंदर्यीकरणाकरीता असे अनुक्रमे ९ कोटी, ३ कोटी व १९ कोटींचा निधी शासनाकडे प्रलंबित असून सदरहू निधी मिळणेकरीता मा.लोकप्रतिनिधी व महानगरपालिकेने शासनाकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर महानगपालिकेच्या विकासकामांचा प्रलंबित निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय क्र.मनपा २०१९/प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १५७ कोटींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. शासन पत्र दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ अन्वये "कृषी विद्यापीठ सायकल ट्रॅक" या कामाचा रुपये ९.४३ कोटी निधी "भोसलेकालीन सक्करदरा तलावाचे सौदंर्यीकरण करणे" या कामासाठी वर्ग करण्यास मान्यता दिलेली आहे.

शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २०२३ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या प्रलंबित कामांसाठी एकूण रुपये २४६.४८५४ कोटी प्रलंबित निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्याबाबत.

**(५) १६१२६ (२८-१२-२०२२) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यगटाची कार्यकक्षा काय असणार आहे व या कार्यगटात सदस्यपदी कोण-कोणत्या मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त कार्यगटाने आतापर्यंत कोणते धोरणात्मक निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येणार आहे?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०७-२०२३) :** (१), (२) व (३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/ प्र.क्र. ४३/ विशि-३ दिनांक २०/०९/२०२२ अन्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये मा.उपमुख्यमंत्री (वित्त), मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता), मा.मंत्री (शालेय शिक्षण), मा.मंत्री (पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय), मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) व मा.मंत्री (कृषी) इ. मंत्र्यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. सदर कार्यगटाचे कार्य हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा म्हणून कार्य करणे, डॉ. माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींनुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांच्या कामकाजाचा वेळोवळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणे, तसेच या विषय समित्यांनी दिलेल्या अहवालातील शिफारशींनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या/ करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे असे आहे.

डॉ. माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींनुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांपैकी ४ समित्यांनी दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक ०६/१२/२०२२ अन्वये सर्व विद्यापीठांना उपरोक्त अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीचे निदेश देण्यात आले आहेत. शासन निर्णय, दिनांक २६/१२/२०२२ अन्वये डॉ. करमळकर यांचे अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांनी केलेल्या शिफारशींनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक आराखड्यासंदर्भात शासन निर्णय, दिनांक २०/०४/२०२३ व दिनांक १६/०५/२०२३ अन्वये निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

## बृहन्मुंबई महापालिकेच्या भूखंड पुनर्विकास धोरणाला कर्मचाऱ्यांचा विरोध केल्याबाबत

**(६) १६४६८ (२९-१२-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने भूखंडाचा पुनर्विकास करण्यासाठी जमीन अधिमुल्य आकारुन परवानगी देण्याचे धोरण तयार केले असून बाजार मूल्याच्या ६२% अधिमूल्य आकारुन परवानगी देण्याचे धोरण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूखंडाचा पुनर्विकास करण्यासाठी आकारण्यात येणारे अधिमूल्य महानगरपालिका कर्मचाऱ्यांना परवडणारे नसल्यामुळे सदर धोरणाला महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहनमुंबई महानगरपालिकेने ४० ते ५० वर्षांपूर्वी कर्मचाऱ्यांना मुंबई येथे भूखंड दिले असून इमारती जुन्या झाल्याने मोडकळीस आल्या आहेत, सदरहू भूखंडाचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे असून महानगरपालिकेचे सदरहू कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सदरहू धोरणाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भूखंड निवासी वापराकरीता मक्त्याने देण्याकरीता काही अपरिहार्य कारणास्तव निविदा न मागविल्यास जमिनीच्या सिध्दगणक दरानुसार येणाऱ्या भूखंडाच्या राखीव किंमतीच्या १२५% इतके एकवेळ अधिमूल्य आकारुन ३० वर्षे इतक्या कालावधीकरीता महानगरपालिकेच्या दिनांक ०४/०५/२०१२ रोजीच्या ठरावानुसार धोरण मंजूर करण्यात आले आहे.

सदर धोरण हे भूखंडाचा पुनर्विकास करण्यासाठी नसून मक्त्याने देण्याकरीताचे आहे.
(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भूखंडांच्या पुनर्विकासाचे धोरण अद्यापि निश्चित झालेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील गट ‘अ’ व गट ‘ब’ संवर्गातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) १६९१७ (२५-०३-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील १ ते २१ विभागातील गट ‘अ’ व गट ‘ब’ संवर्गातील अधिकाऱ्यांची मंजूर व रिक्त पदांबाबत विभागनिहाय प्रस्ताव शासनास सादर केलेला असून सदरहू प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व प्रमुख विभागातील अधिकाऱ्यांची महत्वाची पदे रिक्त असल्याने संबंधित विभागाला आवश्यक कार्यालयीन तथा प्रशासकीय कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील गट ‘अ’ व गट ‘ब’ संवर्गातील अधिकाऱ्यांची मंजूर व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला नाही.

(२) जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार गट अ व गट ब संवर्गातील रिक्त पदांचा कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येऊन प्रशासकीय कामकाज पार पाडण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभारी सचिव, महानगरपालिका या पदावर नियमबाहय नियुक्ती दिल्याबाबत

**(८) १७३८२ (१७-०२-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील प्रभारी सचिव, महानगरपालिका यांची नियमबाह्य नियुक्ती केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत प्रशासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी तांत्रिक व लेखा सेवेतील पदांवर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांची प्रशासकीय सेवेतील पदावर नियुक्ती करता येणार नाही अशी दिनांक १ जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयात स्पष्ट तरतूद नमूद असतानाही प्रभारी सचिव, महानगरपालिका यांची उक्त पदावर नियमबाह्य नियुक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील प्रभारी सचिव पदावर नियुक्त करण्यात आलेल्या प्रभारी पदांचा कार्यभार किती कालावधीकरीता व कधीपासून देण्यात आला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रभारी सचिव, महानगरपालिका या पदावर नियमाबाह्य केलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील, महानगरपालिका सचिव या पदावर महानगरपालिका उप सचिव या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व विधी शाखेची पदवी धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे १००% पदोन्नती करता येईल, अशी दिनांक ०१/०६/२०२१ च्या सेवाप्रवेश नियमात तरतूद आहे.

तथापि, महानगरपालिका सचिव पदासाठीची विहित अर्हता महानगरपालिकेतील/प्रतिनियुक्तीवरील अधिकारी अथवा महानगरपालिका उप सचिव पदावरील अधिकारी पूर्ण करीत नसल्याने, सदर अर्हता प्राप्त अधिकाऱ्यास महानगरपालिका उप सचिव पदाचा दिनांक ३०/११/२०१६ पासून अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

त्यामुळे अतिरिक्त पदाचा कार्यभार देण्याची कार्यवाही नियमबाह्य दिसून येत नाही.

(४) प्रशासकीय सोय व कामकाजाची निकड विचारात घेऊन, प्रभारी महानगरपालिका सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आला असल्याने, पदास योग्य उमेदवार उपलब्ध

झाल्यावर सदर अतिरिक्त पदभार काढण्यात येईल, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांकडे सफाई कर्मचाऱ्यांकडून पैसे मागण्यात येत असल्याबाबत

**(९) १७४१९ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या महिलांच्या नातेवाईकांकडे सफाई कर्मचाऱ्यांकडून (मावशी) थेट पैसे मागण्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसूतीनंतर मागीतलेले पैसे दिले नसल्यामुळे नेरुळ रुग्णालयातील संबंधित महिला सफाई कर्मचारीने रुग्णालयात प्रसूतीकरीता दाखल झालेल्या महिलेची लघवीची बॅग बदलून देण्यास नकार दिला असून तसेच खाटा देण्यासही नकार दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावून कठोर कारवाई करुन त्यांचे निलंबन करण्याबाबत निदेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेने संबंधित महिला सफाई कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिल्यानंतर सदरहू महिला सफाई कर्मचाऱ्यांनी रुग्णालयात आत्मदहन करण्याची धमकी दिल्यामुळे महिला सफाई कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालय प्रशासनावर व संबंधित महिला सफाई कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रूग्णालयांमध्ये वैद्यकीय सेवा विनामूल्य पुरविल्या जातात. सदर रूग्णालयांमध्ये यांत्रिकी पध्दतीने साफसफाई व बहुउद्देशीय रूग्णसेवा पुरविणकामी विहीत निविदा प्रक्रियेअंती M/s. Sigma Techifra Solution India Pvt Ltd, यांना दिनांक ०१/१२/२०२२ पासून कंत्राट देण्यात आलेले आहे.

• सार्वजनिक रूग्णालय, नेरूळ येथील कंत्राटी बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांनी रूग्णाकडून पैशाची मागणी केल्याचे, वर्तमान पत्र व नागरिकांकडून लेखील तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या.

• त्याअनुषंगाने कंत्राटदाराने प्रकरणाशी संबंधित बहुउद्देशीय कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या होत्या.

• तद्नंतर दिनांक २०/०१/२०२३ च्या आदेशान्वये एकूण ५ कर्मचाऱ्यांना पुढील आदेश होईपर्यंत कामावरून कमी करण्यात आलेले आहे.
(५) नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाने सदर बाब गांभिर्याने घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरून कमी करण्याची कार्यवाही कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे.

• भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाही, याबाबत दक्षता घेण्याच्या सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई-सायन-पनवेल मार्गावरील वाशी गाव येथे बस थांब्याचे शेड नसल्याबाबत

**(१०) १७४२७ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई-सायन-पनवेल मार्गावरील वाशी गाव येथील बस थांब्याचे शेड नसल्यामुळे बसच्या प्रतिक्षेत असणाऱ्या प्रवाशांना उन्हाच्या झळा सोसत रस्त्यालगत थांबावे लागत असून त्यामुळे वृध्द व्यक्ती व लहान मुलांना उन्हाचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षतेमुळे मूलभूत सोयी सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बस शेड नसल्याबाबतची समस्या/तक्रार मुख्यालयातील अधिकाऱ्यापर्यंत पोहचत नसल्यामुळे बस थांब्याचे शेड उभारण्याबाबत कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबई-सायन-पनवेल मार्गावर दुरवस्थेत असलेल्या बस थांब्यावर शेड बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) •सायन-पनवेल महामार्गावर प्रवाशांच्या सोयीकरीता नवी मुंबई उपक्रमामार्फत अनेक ठिकाणी बस शेल्टरची उभारणी करण्यात आली होती.

तथापि, सायन-पनवेल महामार्गाचे सिमेंट कॉंक्रीटी करणाचे कामात अडथळा करणारे बस शेल्टर काढून घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ०९/०४/२०१२ च्या पत्रान्वये कळविले.

तद्नंतर सदर मार्गावरील सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झालेनंतर या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बस शेल्टरची उभारणी करण्यात आली होती.

दरम्यानच्या कालावधीत बस शेल्टर नादुरूस्त झाल्याने, दुरूस्ती करणेबाबत नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमास तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने सदर मार्गावरील बस शेल्टरची उभारणी करणेकरीता परिवहन उपक्रमाकडून सायन-पनवेल महामार्गावरील बस शेल्टर जाहिरातीचे हक्कासह नवी मुंबई परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत सार्वजनिक बांधकाम

विभागास कळविण्यात आले होते.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २५/०३/२०२३ च्या पत्रान्वये, सायन-पनवेल रस्त्यावरील सर्व जाहिरातीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा प्रसिध्द करण्याचे काम प्रस्तावित असल्याने, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील बस शेल्टर जाहिरातीच्या हक्कासह हस्तांतरीत करणे शक्य नसल्याच, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील आरक्षण रद्द झाल्याबाबत

**(११) १७६३७ (०९-०२-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे मैदानासाठी आरक्षित असलेला फाळके रोड,दादर येथील २००० चौरस मीटरच्या राखीव असलेल्या भूखंडावरील आरक्षण रद्द करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मोक्याच्या जागी असलेला २००० स्क्वेअर मीटर भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यातून गेल्यामुळे सध्याच्या बाजारभावानुसार रुपये १५० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू आरक्षण रद्द करण्याच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याकरीता राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) दादर-नायगाव विभागातील सी.एस. क्र. ९० (भाग) या भूखंडावरील आरक्षण व्यपगत झाल्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०२२ रोजी पारित केले आहेत.

(२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तत्कालीन तरतुदींचा विचार करता, मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०९/१२/२०२२ रोजीच्या आदेशाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एस.एल.पी.) दाखल करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१२) १७८६० (०२-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीमध्ये माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये रुपये ६० ते ७० कोटींचा अपहार झाल्याप्रकरणी दापोली नगरपंचायतीचे लेखापाल यांना अटक करण्यात आली असून सदरहू आर्थिक गैरव्यवहारात अनेकजण असण्याची शक्यता असल्याने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी श्री.प्रसाद रेळेकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) दापोली नगरपंचायतीच्या कार्यालयीन प्राथमिक चौकशी अहवालावरुन नगरपंचायत निधीचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आली असून यास जबाबदार असलेले नगरपंचायतीचे तत्कालिन लेखापाल यांना निलंबित केले आहे. तसेच त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली, ही वस्तूस्थिती आहे.

(२) नगरपंचायतीच्या विविध खात्यांमधील जमाखर्चाच्या नोंदी तपासत असताना काही संशयास्पद नोंदी निदर्शनास आल्या.

त्यावरुन मुख्याधिकारी यांनी सदर प्रकरणी नगरपंचायतीच्या कार्यालयीन चौकशी समितीचे गठन केले.

नगरपंचायतीच्या कार्यालयीन चौकशी समितीने आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या काळातील नोंदी तपासून अहवाल सादर केला. सदर अहवालावरुन वर्ष २०२१-२२ या कालावधीत रुपये ५,८१,१०,३०९/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

त्यावरुन तत्कालिन लेखापाल यांना निलंबित करण्याची, तसेच स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, दापोली नगरपंचायत यांचेमार्फत करण्यात आली आहे.

तत्कालिन लेखापाल यांच्याकडे मागील अनेक वर्षापासून असलेला लेखापाल पदाचा कार्यभार, तसेच प्रकरणाची व्याप्ती विचारात घेऊन उर्वरित कालावधीतील चौकशी करीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत दिनांक २०/१२/२०२२ रोजी "त्रिसदस्यीय चौकशी समिती " चे गठन करण्यात आले आहे.

तसेच अपहाराची व्याप्ती विचारात घेऊन दापोली नगरपंचायतीचे सन २००१ ते २०२२ या कालावधीतील विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई यांना सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारी विकासकामे आणि सुशोभिकरणाची कामे अपूर्ण व दर्जाहीन असल्याबाबत

**(१३) १७८६२ (०२-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात महानगरपालिकेच्या विविध माध्यमातून सुरु असलेली कोट्यवधी रुपयांची विकासकामे व सुशोभिकरणाची कामे संबंधित अधिकारी आणि कंत्राटदाराच्या संगनमताने अपूर्ण व दर्जाहीन झाली असतानाही कंत्राटदाराना देयकांची संपूर्ण रक्कम अदा करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांची चौकशी होऊन संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन पुराव्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१), (२) व (३) अशा आशयाची बातमी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली असून ठाणे शहरातील सुरू असलेल्या विकास कामांची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार ठाणे शहरांतर्गत सुरू करण्यात आलेली विकास कामे निविदेतील विहित अटी व शर्तीनुसार योग्य गुणवत्ता राखुन पूर्ण झाल्यानंतरच सबंधित कंत्राटदाराचे देयके अदा करण्यात येतात.

सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीतील मुद्द्यांची शहनिशा करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई तसेच मुंबई उपनगरात गोवर संसर्गाचा प्रादुर्भाव वाढून मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१४) १७८७५ (१४-०२-२०२३) श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथील नऊ महिन्यांच्या मुलाचा व ट्रॉम्बे येथील सहा महिन्यांच्या मुलीचा गोवराने मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गोवरमुळे झालेल्या एकूण २३ मृत्यूंची नोंद झाली आहे काय, तसेच मुंबई पूर्व उपनगरातील कुर्ला, चुनाभट्टी येथे निश्चित निदान असलेले रुग्ण आणि संशयित रुग्ण यांच्या संख्येत वाढ झालेली दिनांक १०/०१/२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोवर संसर्गाच्या वाढत्या प्रादूर्भावामध्ये ‘‘डि ८’’ प्रकारच्या विषाणूचा संसर्ग अधिक प्रभावशाली असल्याचे प्रयोगशाळांच्या चाचण्यांमधून नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून ‘‘ डि ८ ’’ हा प्रादुर्भाव राज्यातील कोणत्या भागात आढळून आला आहे व त्याची किती रुग्णाना लागण झाली आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने गोवर संसर्गाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणून गोवरमुळे मृत्यू संख्येत होत असलेली वाढ रोखण्यासाठी शासनाने तातडीने कोणती उपाययोजना केली आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १६/०२/२०२३ पर्यंत ताप व पुरळ असलेल्या २३ मृत्यूंची नोंद झाली असून, त्यापैकी ३ मृत्यू मुंबईबाहेरील वास्तव्य असलेल्या रुग्णांचे आहेत. मुंबईतील २० मृत्यूंपैकी १५ मृत्यू हे निश्चित गोवर रुग्णाचे असून, ५ मृत्यू गोवरमुळे झाले नसल्याचे मत मृत्यू संशोधन समितीने दिले आहे.

तसेच, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक १० जानेवारी, २०२३ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “एल” विभागात ६१ गोवर निश्चित रुग्ण आढळून आले आहेत.

(३) माहे जानेवारी, २०२२ ते दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ पर्यंत “डि ८” प्रकारच्या विषाणूचा संसर्ग तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या २४७ नमुन्यांमध्ये १४७ रुग्णांचा अहवाल पॉझिटीव्ह आला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

माहे जानेवारी, २०२३ मध्ये राज्यातील १७ जिल्हे व १३ महानगरपालिका हद्दीमध्ये “डी८” प्रकारच्या विषाणूचा संसर्ग असलेले २३९ रुग्ण सापडले आहेत. तसेच, सदर विषाणूचे सर्वाधिक रुग्ण मुंबई ५८, औरंगाबाद मनपा २३, सोलापूर मनपा ११, लातूर ११, अकोला १७ तसेच नवी मुंबई मनपा, रायगड, नागपूर मनपा प्रत्येकी ९ रुग्ण आढळले आहेत, असे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

(४) गोवर आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-• ताप व पुरळ रुग्णांचे सक्रीय सर्वेक्षण, ताप व पुरळ असलेल्या रुग्णास जीवनसत्व “अ” च्या दोन मात्रा २४ तासांच्या अंतराने देण्यात येत आहेत.

गोवर संशयित रुग्णांना आवश्यकतेनुसार रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

नियमित लसीकरण कार्यक्रमासोबत अतिरिक्त लसीकरण सत्रांचे व जोखीमग्रस्त भागात फिरते लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

लसीकरणांपासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी विशेष लसीकरण मोहिमेच्या दोन फेऱ्या राबविण्यात आल्या आहेत.

गोवर उद्रेक असलेल्या आरोग्य केंद्रांत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ९ महिने ते ५ वर्षे वयोगटातील गोवर रुबेला लसीची अतिरिक्त मात्रा व ९ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या बालकांमये गोवर

निश्चित रुग्णांचे प्रमाण १० टक्के पेक्षा जास्त असलेल्या आरोग्य केंद्रांत ६ महिने ते ९ महिने वयोगटातील बालकांना गोवर रुबेला लसीची शून्य मात्रा देण्यात येत आहे.

सदर आजाराच्या लोकजनजागृतीसाठी खाजगी डॉक्टर, धर्मगुरु / इतर प्रभावी व्यक्ती यांना गोवर आजार तसेच लसीकरणाविषयी अवगत करुन पालकांमध्ये लसीकरणाविषयी सकारात्मक बदल घडवून मुलांचे लसीकरण करुन घेण्यात येत आहे.

तसेच राज्यामध्ये खालीलप्रमाणे गोवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत, असे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे:-

• राज्यात टास्क फोर्सची स्थापना व आंतरविभागीय समन्वय
• सर्व जिल्ह्यात टास्क फोर्स कार्यरत करण्यात आले.
• घरोघर गोवर रुग्ण सर्वेक्षण
• उद्रेक प्रतिसाद लसीकरण उद्रेकग्रस्त भागात सुरु करण्यात आले.
• नियमित लसीकरणावर भर
• राज्यव्यापी विशेष गोवर रुबेला लसीकरण अभियान पहिला टप्पा १५ ते २५ डिसेंबर व दुसरा टप्पा १५ ते २५ जानेवारी असे राबविण्यात आले.
• प्रत्येक संशयित गोवर रुग्णाला जीवनसत्त्व "अ" देण्यात आले आहे.
• जिल्हा आणि राज्यस्तरावर पुरेसा गोवर रुबेला लस साठा उपलब्ध करण्यात आला आहे.
• समाज प्रबोधन / आरोग्य शिक्षण / स्थानिक प्रभावी व्यक्तींची लसीकरणासाठी मदत घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई ट्रान्स हर्बर लिंकचे काम पूर्ण क्षमतेने करण्याबाबत

**(१५) १८१२८ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ट्रान्स हर्बर लिंक वरळी ते गोवा आणि वरळी ते पुणे ह्या दोन मार्गाच्या कामांची दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पर्यंत सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, मुंबई ट्रान्स हर्बर प्रकल्पाकरीता अद्यापपर्यंत किती खर्च करण्यात आला आहे तसेच सदरहू कामाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई ट्रान्स हर्बर लिंकचे काम पूर्ण क्षमतेने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०६-२०२३) :** (१) शिवडी ते न्हावाशेवा (चिर्ले) या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक या २१.८ कि.मी. सागरी सेतूमार्गाचे दिनांक ३१ जानेवारी, २०२३ अखेर ९०% काम पूर्ण झाले आहे.

सदर सागरी सेतू मार्गास मुंबईकडील बाजूने जोडण्यासाठी वरळी ते शिवडी असा सुमारे ४.५ कि.मी. लांबीचा उन्नत मार्ग बांधण्यात येत असून, सदर प्रकल्पाचे ३९ % काम पूर्ण झाले आहे. तसेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक मार्गाला मुंबई-पुणे द्रुतगती मार्गास जोडण्यासाठी चिर्ले ते गव्हाण फाटा हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आला असून, प्रकल्पासाठी निविदा प्रक्रीया

प्रगतीपथावर आहे.

(२), (३) व (४) मुंबई ट्रान्स हार्बर प्रकल्पावर डिसेंबर, २०२२ पर्यंत अंदाजे रुपये १५,८०० कोटी इतका खर्च झाला आहे. हा प्रकल्प मुंबईतील शिवडी व नवी मुंबईतील चिर्ले या दरम्यान असून, या प्रकल्पात मुंबईतील शिवडी येथे तर नवी मुंबईतील शिवाजीनगर व चिर्ले येथे आंतरबदल होणार आहेत. यामुळे नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळ व जेएनपीटी यांचेशी वेगवान जोडणी शक्य होणार आहे. सदर शिवडी ते न्हावाशेवा (चिर्ले) पर्यंतच्या प्रकल्पाचे काम माहे डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.

---

## मुंबई उपनगरातील जोगेश्वरी, मागाठाणेतील दहिसर नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(१६) १८२७२ (१७-०२-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी, मागाठाणेतील दहिसर नदीवरील पुल बांधण्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूलाचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुलाचे बांधकाम पूर्ण करुन वाहतूक कोंडी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) जोगेश्वरी येथील उड्डाणपुलाच्या परिसरात वाहतूक कोंडी होत आहे, तथापि, त्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत असे मुंबई महानगर प्रदेशिवकास प्राधिकरणाने कळविले आहे.

(२) व (३) जोगेश्वरी (दक्षिण) येथील उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर पुलाच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून, बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्याचे नियोजित आहे. सदर उड्डाणपुलाचे काम सुरु झाल्यानंतर सदर जागेवर वाहतूक कोंडीचे निवारण करण्यासाठी आवश्यकतेनुसार ट्राफिक वॉर्डन, पर्यायी मार्ग नियोजन इत्यादी उपाययोजना करण्यात येणार आहेत, असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

मागाठाणेतील दहिसर नदीवरील श्रीकृष्णनगर येथील पूल जीर्णावस्थेत व धोकादायक झाला असल्यामुळे सदर पूल तोडण्यात आला आहे. सदर ठिकाणी पूल पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर पुलाच्या फेज-१ चे काम दिनांक ३१ मार्च, २०३१ पर्यंत पूर्ण करुन, सदर पुल वाहतुकीस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरविकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या वतीने आर्थिक दुर्बल घटकांतील गृहप्रकल्पाच्या सोडतीमध्ये घरे न मिळालेल्या नागरिकांची आगाऊ रक्कम परत देण्याबाबत

**(१७) १८३२५ (०२-०३-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरविकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या वतीने सेक्टर १२ याठिकाणी आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात आला असून सदर गृहप्रकल्पाच्या सोडतीमध्ये ज्या नागरिकांना घरे मिळाली नाहीत त्या नागरिकांची १० टक्के आगाऊ रक्कम मिळाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहप्रकल्पाच्या सोडतीमध्ये घरे न मिळालेल्या २५४ नागरिकांचे रुपये दोन कोटींची देणी पुणे महानगरविकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गृहप्रकल्पाच्या सोडतीमध्ये घरे न मिळालेल्या नागरिकांची आगाऊ रक्कम परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) सदर गृहप्रकल्पाच्या सोडतीमध्ये ज्या नागरीकांना घरे मिळाली नाही त्यांची संख्या २५४ इतकी आहे त्यापैकी २४८ नागरीकांना RTGS द्वारे १० टक्के आगाऊ स्वरुपात जमा रक्कम रुपये १,८७,९६,०००/- परत करण्यात आली आहे. उर्वरित ६ नागरिकांची IFSC कोड उपलब्ध नसल्यामुळे १० टक्के आगाऊ रक्कम परत करण्यात आलेली नाही. सदर ६ नागरिकांकडून IFSC कोड प्राप्त करुन घेण्याचे काम चालू आहे. तसेच सदर नागरिकांकडून IFSC कोड प्राप्त झाल्यानंतर त्यांना RTGS द्वारे रक्कम परत करण्यात येईल.

---

## माजी मुख्यमंत्री मारोतराव उर्फ कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांची शासन स्तरावर जयंती व पुण्यतिथी साजरी करण्याबाबत

**(१८) १८३३५ (२५-०३-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक १२९४२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय, निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती यांचे जयंती/राष्ट्रीय दिन करावयाचे जयंती दिन साजरे करण्याबाबतचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने सन २०२३ मध्ये प्रसिध्द केले असून थोर स्वातंत्र्य सैनिक आणि राज्याचे दुसरे मुख्यमंत्री डॉ.मारोतराव कन्नमवार यांचे नाव सदरहू परिपत्रकामध्ये समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मारोतराव उर्फ कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचा पुतळा नागपूरच्या विधिमंडळ इमारतीच्या परिसरामध्ये मुख्य प्रवेशद्वाराजवळ असतानाही त्यांची जयंती अथवा पुण्यतिथी शासनाकडून साजरी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माजी मुख्यमंत्री मारोतराव उर्फ कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे
(३) डॉ.मारोतराव उर्फ कर्मवीर मा.दादासाहेब कन्नमवार यांचा सन २०२३ मधील जयंती कार्यक्रमामध्ये समावेश करण्यासाठी शासन स्तरावर उचित कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरामध्ये पाणी निचरा करण्यासाठी पंम्पिंग स्टेशन उभारण्याबाबत

**(१९) १८३८९ (१७-०२-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने माधवराव चितळे समितीच्या शिफारशीनुसार शहर तसेच उपनगरामध्ये आठ ठिकाणी पावसाळयातील पाणी निचरा करण्यासाठी पंम्पिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पंम्पिंग स्टेशन कोणकोणत्या विभागात बसविण्यात येणार आहे, पंम्पिंग स्टेशनकरीता किती खर्च येणार आहे, पंम्पिंग स्टेशनची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहर व उपनगरामध्ये पाणी निचरा करण्यासाठी पंम्पिंग स्टेशन पावसाळयापूर्वी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) व (२) माधवराव चितळे समितीच्या शिफारशीनुसार मुंबई शहर व उपनगरातील पुरपरिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याकरीता ८ पर्जन्य जल उदंचन केंद्रे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर पर्जन्यजल उदंचन केंद्राचे नाव, ठिकाण व उभारणीचा खर्च खालीलप्रमाणे आहे :-१. हाजीअली, महालक्ष्मी – रुपये ५९.४८ कोटी
२. लव्हग्रोव्ह, वरळी – रुपये ९७.७० कोटी
३. ब्रिटानिया, रे रोड – रुपये ८६.६८ कोटी
४. क्लिवलँड, वरळी – रुपये ७७.८१ कोटी
५. इर्ला, जुहू – रुपये ६५.९३ कोटी
६. गजदरबंध, सांताक्रुझ – रुपये १०५.०५ कोटी
७. मोगरा, वर्सोवा – २५३.८८ कोटी
८. माहुल, चेंबुर – ४१५.२२ कोटी

यापैकी मुंबई शहरातील हाजीअली, क्लिवलँड, लव्हग्रोव्ह आणि ब्रिटानिया या ४ पर्जन्यजल उदंचन केंद्रांची व मुंबई उपनगरातील इर्ला आणि गझधरबंध या २ पर्जन्यजल उदंचन केंद्रांची कामे पूर्ण झाली आहेत. सदर ६ पर्जन्यजल उदंचन केंद्रे सन २०१९ पूर्वीच पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

उर्वरित २ पर्जन्यजल उदंचन केंद्रांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१. मोगरा पर्जन्यजल उदंचन केंद्र :- सदर प्रकल्पाकरीता जमिनीच्या मालकी हक्काचे प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये कंत्राटदारास सर्व्हेक्षक, मृदा परिक्षण, आराखडे व संकल्पचित्रे तयार करण्याकरीता अंशत: कार्यादेश देण्यात आला असून त्यानुषंगाने काम प्रगतीपथावर आहे.

२. माहुल पर्जन्यजल उदंचन केंद्र :- सदर केंद्र हे मिठ आयुक्त, केंद्र सरकार यांच्या मालकीच्या जमिनीवर प्रस्तावित आहे. त्याकरीता मिठ आयुक्त यांच्याकडील जमीन महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याकरीता पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच या केंद्राकरीता निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) मोगरा व माहूल येथील उदंचन केंद्रांचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण होणे शक्य नाही. तथापि, महानगरपालिकेच्या सर्व विभागामधून पावसाचे पाणी साठणाऱ्या ठिकाणाची माहिती प्राप्त करुन तेथे पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याकरीता पावसाळयापूर्वी पंप लावण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील रेल्वे स्थानक परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांना हटविण्याबाबत

**(२०) १८३९२ (१७-०२-२०२३) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल व चर्चगेट रेल्वे स्टेशन परिसरालगत अनधिकृत फेरिवाल्यांनी अतिक्रमण केल्यामुळे प्रवाशांना ये-जा करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर फेरीवाल्यांना बसण्यास मनाई असतानाही प्रत्यक्षात सदरहू आदेशाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांची गर्दी वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत फेरीवाल्यांकडून नियमांचे उल्लंघन केले जात असून रेल्वे स्थानक आणि परिसरातील गर्दी तसेच अनधिकृत फेरीवाले हटविण्याची मागणी प्रवाशांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील रेल्वे स्थानक परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांना हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) : (**१) व (२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) अनधिकृत फेरीवाल्यांबाबत प्राप्त तक्रारींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते.
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल व चर्चेगेट या दोन्ही रेल्वेस्थानकापासून १५० मीटरच्या परिसरात फेरीवाल्यांना प्रतिबंध करण्याकरीता सीमांकन करण्यात आले असून दोन सत्रामध्ये निरीक्षक व कामगार यांची नियुक्ती करण्यात येते. नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षक व कर्मचाऱ्यांमार्फत तसेच स्थानिक पोलीस प्रशासनामार्फत सतत गस्त घालण्यात येवून रेल्वे स्थानकापासून १५० मीटरचा परिसर अनधिकृत फेरीवाला मुक्त ठेवण्यात येतो. गस्त घालताना अनधिकृत फेरीवाले आढळून आल्यास पोलीस प्रशासन व महानगरपालिकेमार्फत तात्काळ निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल व चर्चगेट रेल्वे स्टेशन परिसरामध्ये सन २०२२ मध्ये एकूण १४३९ अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच २४ विभागामध्ये सन २०२२ मध्ये एकूण १,७५,९८० अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून रुपये २,५०,२८,६५५/- इतक्या रकमेची दंड वसूली करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.